**प्रश्न १ ला. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

१. भारताच्या संविधनाने निवडणूक घेण्यासाठी एका स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद केली आहे.
२. उमेदवाराच्या अर्जाची काटेकोर छाननी निवडणूक आयोग करते.
३. निवडणूक संबंधी वादाशी निवडणूक आयोगाचा काहीही संबंध नसतो.
४. मतदानाच्या वेळी मतमोजणी करताना राजकीय पक्षाचे प्रतिनिधी हजर असतात.
५. उमेदवाराकडून त्याच्या विभागातील महिलांना साड्या वाटल्यास चांगले.
६. निवडणूक आयोग निवडणुकी दरम्यान आचारसंहिता लागू करते.
७. विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोगाने एखादा मतदार संघात पुन्हा निवडणूक घेतात.
८. एखाद्या घटक राज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घ्यायच्या हे राज्यसरकार ठरवते.

**प्रश्न २ रा. थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. निवडणुकांमुळे कोणकोणत्या गोष्टी घडतात?
२. निवडून येणारे प्रतिनिधी कसे असावेत असे आपल्याला वाटते?
३. भारताच्या संविधानाने स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद का केली आहे?
४. आपल्या देशातील सर्व महत्त्वाच्या निवडणुका कोण घेतो?
५. निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली कोणती कामे केली जातात?
६. निवडणूक आयोगाची निर्मिती संविधानाच्या कोणत्या कलमानुसार झाली ? निवडणूक आयोगात कोणते अधिकारी असतात?
७. निवडणूक आयुक्तांची नेमणूक कोण करतो?
८. निवडणूक आयोग निवडणूक प्रक्रिया कोणाच्या मदतीने पार पाडते?
९. निवडणूक आयोगाची कार्ये थोडक्यात सांगा.
१०. मतदार याद्यांबाबत कोणती सावधानता निवडणूक आयोग बाळगते?
११. निवडणूक लढवणारे उमेदवार निवडणूक प्रक्रियेत कसे सहभागी होतात?
१२. निवडणूक आयोगाला कोणते अधिकार असतात?
१३. लोकसभेतील एकूण सदस्य संख्या किती आहे?
१४. लोकसभेचे एकूण मतदारसंघ किती?
१५. मतदारसंघ निर्माण करण्याचे काम कोण करते?

१६. निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय?

१७. निवडणूक आयोगाला कोण-कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागतो?

१८. पुस्तकात सुचवलेल्या निवडणूक सुधारणा थोडक्यात सांगून त्याचे कोणते परिणाम होतील हे सांगा.